जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २३ दिनांक - १२/०१/२०२५**

गुन्हे शाखा, युनिट-२,पुणे शहर

# हडपसर भागातून एकुण ८३,०००/- रु. चे अफिम बोडयांचा चुरा (पॉपीस्ट्रा) हा अंमलीपदार्थ जप्त

पुणे शहरात अंमली पदार्थ विक्री करणा-या इसमांवर कायदेशीर कारवाई करणेचे वरिष्ठांनी आदेशीत केले होते.अनुंषगाने पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.निखील पिंगळे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ०२ कडील अधिकारी व अमंलदार युनिट हददीत गस्त करीत असताना दि.११/०१/२०२५ रोजी पोलीस अंमलदार प्रमोद कोकणे व राहुल शिंदे यांना गुप्त बातमीरामार्फत माहिती मिळाली की,सय्यदनगर हडपसर पुणे येथ्रील चिंतामणीनगर येथे एक इसम ॲक्टीवा गाडीवर अफिमच्या बोंडयाचा चुरा पॉपीस्ट्रा विक्री करणेसाठी घेवून येणार आहेत अशी बातमी मिळाली.

सदर बातमी युनिट प्रभारी पोलीस निरीक्षक श्री प्रताप मानकर यांना दिली असता त्यांनी युनिट कडील अधिकारी व अमंलदार यांना सापळा व छापा कारवाई करणेकामी आदेशीत केले. त्याप्रमाणे युनिट कडील अधिकारी व अमंलदार यांनी मिळालेल्या गोपनिय बातमीप्रमाणे काळेपडळ पोलीस स्टेशनशी संपर्क करुन संयुक्तरित्या छापा कारवाई करुन इसम नामे **सुमेरलाल गिरीधरलाल चौधरी वय ३० रा बिग मार्ट शेजारी चिंतामणी नगर हडपसर मुळ रा जोधपुर राजस्थान** यास ताब्यात घेवून त्याचेकडून ॲक्टीवा गाडी,रोख रक्कम व ६१५ ग्रॅम प्रॉपीस्टा अंमली पदार्थ असा ८३,०००/ रु कि.चा मुद्देमाल जप्त केला आहे. त्याचेवर काळेपडळ पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि क्रमाक ३१/२०२५ एन डी पी एस ॲक्ट कलम ८ (क) १५ (अ) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.अधिक तपास पोलीस उप निरी.प्रशांत लटपटे काळे पडळ पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे श्री शैलेश बलकवडे, पोलीस उप-आयुक्त,गुन्हे, श्री.निखील पिंगळे, मा.सहा.पो.आयुक्त गुन्हे,१ श्री गणेश इंगळे, यांचे मार्गदर्शनाखाली युनिट-२ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. प्रताप मानकर, सपोनि आशिष कवठेकर, अमोल रसाळ, पो.उप.निरी. नितीन कांबळे, पोलीस अंमलदार प्रमोद कोकणे,राहुल शिंदे, शंकर नेवसे, ओमकार कुंभार, हनुंमत कांबळे, उज्वल मोकाशी, शंकर कुंभार, संजय जाधव,अमोल सरडे, गणेश थोरात विनोद चव्हाण, विजयकुमार पवार, साधना ताम्हाणे, निखिल जाधव, पुष्पेंद्र चव्हाण, नागनाथ राख व यांनी केलेली आहे.